जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र ९८१९२०८२७९

प्रेसनोट **दि. ०५.०६.२०२५**

''ठाणे पोलीस आयुक्तालया अंतर्गत शांतता समितीची बैठक आयोजित केले बाबत''

ठाणे पोलीस आयुक्तालयात दिनांक ०७/०६/२०२५ रोजी बकरी ईद व दिनांक १०/०६/२०२५ रोजी वटपोर्णिमा हे सण साजरे होणार आहेत. त्या अनुषंगाने दिनांक ०५.०६.२०२५ रोजी सिध्दी हॉल, ठाणे येथे श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे अध्यक्षतेखाली शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीस सह पोलीस आयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण व इतर पोलीस अधिकारी तसेच शांतता समितीचे १६५ सदस्य उपस्थित होते.

या बैठकीत मा.पोलीस आयुक्त, ठाणे यांनी उपस्थित शांतता समिती सदस्यांनी अगामी सणाच्या संदर्भात मांडलेले मुद्दे व सुचना ऐकुन घेवुन त्यांच्या सुचनांचे निरसन करून सण/उत्सवा दरम्यान येणाऱ्या अडचीणींवर योग्य ते मार्गदशन करून, सण/उत्सव शांततेत साजरे करावे असे आवाहन केले. तसेच सण साजरे करताना काही समाज कंठकां कडून दोन धर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो अशावेळी सर्वानी एकता व बंधुत्वाची भावना जोपासून सदर सण/उत्सव शांततेने व जबाबदारीने पार पाडले पाहिजेत. अशावेळी नागरिकांनी पोलीसांचे कान व डोळे होवून कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास पोलीसां पासून लपवून न ठेवता त्यांना तात्काळ डायल ११२, पोलीस नियंत्रण कक्ष, ठाणे दूरध्वनी क्रमांक २५४४३५३५, इंन्स्टाग्राम हॅन्डल https://www.instagram.com/thanecitypolice_ official? igsh=d28xZjFsYW9lc3M, एक्स खाते @ThaneCityPolice, फेसबुक खाते https:// www.facebook.com/share/ 12LETYEgYCt/ यावर कळविण्याचे आवाहन पोलीस आयुक्त यांनी केले. सदर वेळी उपस्थित असलेले शांतता समिती सदस्य यांनी उपस्थित केलेल्या समस्या व सुचनांची देखील त्वरीत पुर्तता करण्याचे आश्वासन श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे यांनी केले आहे. बैठकीच्या शेवटी सर्व नागरीकांना बकरी ईद व वटपोर्णिमा सणाच्या ठाणे शहर पोलीस दलातर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर